# हिस्सारला जाण्याचे टाळण्यासाठीच अण्णांचे मौनव्रत-राजू परुळेकर

नवी दिल्ली, दि. २१-अण्णा हजारे यांना पक्षीय राजकारण अजिबात रस नव्हता. हिस्सारमधील लोकसभेच्या पोटनिवडणुकीत काँग्रेसविरोधात भूमिका घेण्याचेही त्यांना पसंत नव्हते, परंतु, अरविंद केजरीवाल, किरण बेदी आणि प्रशांत भूषण यांनी अण्णांवर दबाव टाकून काँग्रेसला मतदान करू नका, असा मतदारांना आवाहन करणारा व्हिडिओ तयार करवून घेतला. हिस्सारमध्ये जाण्याचे टाळण्यासाठीच तेव्हा अण्णांनी मौनव्रत धारण केले होते, असा दावा हजारे यांचे माजी ब्लॉगर राजू परुळेकर यांनी सोमवारी येथे पत्रकार परिषदेत केला.



आमची संमती घेतल्यानंतरच अण्णांचा ब्लॉग अपडेट करावा यासाठी केजरीवाल, बेदी आणि प्रशांत भूषण माझ्यावर दबाव टाकत होते, असे परुळेकर म्हणाले. स्वतः अण्णा हजारे यांनी टीम अण्णाच्या पुनर्रचनेबाबत लिहून दिले होते. अण्णांना कोर समिती बरखास्त करून दुसरीच संघटना स्थापन करायची होती. त्यातून या तिघांनाही बाहेर ठेवायचे होते. अण्णांनी तसे स्पष्ट लिहलेही होते. परंतु, त्यांचे स्वीय सहायक सुरेश पठारे यांनी मला रोखले, असे परुळेकर म्हणाले. हे तिघेही अण्णांवर प्रचंड दबाव आणतात आणि त्यांचा वापर करून घेतात, असेही परुळेकर यांनी सांगितले. उपोषणानंतर अण्णांची प्रकृती अजूनही सुधारली नाही. असे असताना हे तिघे अण्णांना पाच राज्यांच्या दौऱ्यावर घेऊन जाणार होते: अण्णांना उपोषणासाठी या तिघांनीच दबाव आणला. तुम्ही उपोषण केले नाही तर लोकपाल विधेयक मंजूर होणार नाही, असे सांगून ते वारंवार अण्णांवर उपोषण करण्यासाठी दबाव टाकत होते, असे परुळेकर यांनी सांगितले.